सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/ग्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-२० क्र. ३०२
दि. २१/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ३४९
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-२/३४९

मालमत्ता कराची आकारणी करीत असताना इमारतीचे नियमानुसार १० टक्के घसारा (मेन्टेनन्स) वजा करणेची कार्यवाही करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ८ च्या नियम ७ (१) मधील तरतुदीनुसार जमिनीचे किंवा इमारतीचे वार्षिक भाडयातून १५ टक्के ऐवजी १० टक्के रक्कम वजाती करणेबाबतची कार्यवाहीस तसेच प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सन २००५-०६ ते सन २००९-१० या चतुर्थ वार्षिक कर आकारणीतील करपात्र मुल्य ठरविताना १५ टक्क्याप्रमाणे वजाती करुन जी रक्कम कमी वसूल झाली आहे (र.रु. १३.३६ कोटी) इतकी रक्कम वसूलीची कार्यवाही निर्धारीत टप्पे ठरवून करणेत येणार असलेचे मा. शासनास कळविले आहे. यास्तव सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून पुढे सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतींना महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ८ च्या नियम ७ (१) मधील तरतुदीनुसार जमिनीचे किंवा इमारतीचे वार्षिक भाडयातून १५ टक्के ऐवजी १० टक्के रक्कम वजाती करणेबाबत तसेच सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीतील रक्कम रु. १३.३६ कोटी इतकी रक्कम मिळकतदाराकडून वसूल करणेची बाब धोरणात्मक असल्याने सदर रक्कमेच्या वसुलीबाबत धोरण निश्चित होऊन मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १८-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा.म.न.पा.ठराव क्र.१४१, दिनांक २९-८-१९७० च्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-३ ठ. क्र. ३०३
दि. ९.३.१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/३५०

सन २०१५-१६ सालच्या मिळकत कर आकारणी कामी दर निश्चित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव यापूर्वी सादर करण्यांत आलेल्या विभागानुसार प्रारुप दरसूचीमध्ये सुचविलेल्या दरानुसार व कार्यपध्दतीप्रमाणे दर निश्चित व्हावे. अथवा नगर रचनाकार यांनी विभाग दर्शविणारे नकाशातील रस्त्याच्या बाजूला असणा-या मिळकतींना वेगळे दर व अंतर्गत भागात असणा-या मिळकतींना वेगळे दर लावून आकारणाची कार्यवाही ठेवणेकामी दर निश्चित करता येतील त्याचप्रमाणे १) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील, शासकीय, निमशासकीय, दवाखाना या व्यतिरिक्त पेट्रोल पंप, सिनेमा थिएटर, नाटयगृह, मंगल कार्यालय, सांस्कृतिक, शैक्षणिक इमारत इत्यादी तत्सम इमारतीसाठी मुल्यांकन करणेकामी मूल्य दर निश्चित करणे. २) त्याचप्रमाणे विनापरवाना बांधकामाची आकारणी निश्चित करणे ३) भाडे करारात भाडया व्यतिरिक्त टॅक्स भरण्याबाबतही करार झालेला असल्यास त्याचे मुल्य दर निश्चित करणे ४) मिळकत हस्तांतर व मिळकतीच्या वापरातील बदलानंतर अशा मिळकतीचे मुल्य दर निश्चित करणे प्रस्तावात नमूद प्रमाणे जीआयएस प्रणालीद्वारे होणा-या सर्व्हेअंती मिळकत कर आकारणीचे दर निश्चित करणेची बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम ९९ मधील तरतुदीनुसार नव्याने प्रस्तावित केलेले कराचे दर निश्चितीची कार्यवाही माहे २० फेब्रुवारी २०१६ पर्यंत होणे आवश्यक असलेने धोरण निश्चित होऊन निर्णय मिळणेकामी मा. आयुक्त यांचे १८-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

दर चार वर्षांनी मिळकत कर रिव्हीजन करणे आवश्यक होते. सन २००५ पासून आजतागायत मिळकत कर रिव्हीजन न करता संबंधित यंत्रणेने म.न.पा.चे आतोनात नुकसान केलेले आहे. सदर वित्तीय नुकसानीस केवळ कर आकारणी विभागाकडील यंत्रणाच जबाबदार असलेने संबंधिताकडून होणारी रक्कम वसूल करणेस मान्यता देणेत येत आहे. नोंद नसलेल्या मिळकतीचा शोध घेऊन कर आकरणी उत्पन्न वाढवावे. आणि रिव्हीजनचे काम तातडीने हाती घेऊन सुरु करणेत यावे. सध्याचे प्रचलित पध्दतीने व प्रचलित दरानुसार शहर व हद्दवाढ विभागाकडील कर आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे. शहर व हद्दवाढ भागातील खुल्या जागेला म.न.पा. आकारीत असलेले टॅक्स अत्यंत जास्त आहे. त्यामुळे त्याच्यावर अन्याय होत आहे. सबब शहर व हद्दवाढ भागातील खुल्या जागेची कर आकारणी २ टक्के प्रमाणे करण्यांस मान्यता देण्यात येत आहे. २ टक्के पेक्षा अधिक टॅक्सची आकारणी करण्यांत येऊ नये. म.न.पा.ने ज्या अधिक टॅक्सची आकारणी करुन ज्या नोटीसा पाठविल्या आहेत त्या रद्द करुन २ टक्के प्रमाणे टॅक्सची आकारणी करुन नवीन नोटीसा पाठवून द्यावेत. तोपर्यंत कोणत्याही नागरिकाविरुध्द कसल्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत येऊ नये. मा. आयुक्तांनी या ठरावाप्रमाणे खुल्या जागेची आकारणी २ टक्के प्रमाणे करावी, यांस ही सभा मान्यता देत आहे.

मा. आयुक्त यांनी शहर व हद्दवाढ भागातील जीआयएस सर्व्हे (मिळकतीचा शोध) घेणेची कार्यवाही ही जून २०१६ पर्यंत पूर्ण करुन घ्यावे. तसेच राहिलेले सर्व रिव्हीजनचे काम ज्यादा सेवकवर्ग नियुक्त करुन डिसेंबर २०१६ अखेर पूर्ण करावे. रिव्हीजन करताना शहर व हद्दवाढ एरियाचे विविध भाग करुन कार्यवाही जलदगतीने पूर्ण करावे यांस ही सभा मान्यता देत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३९५ ठ. क्र. ३०४
दि. २१/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महिला व बालकल्याण समितीचे बजेट विवरण पत्रातील बजेट हेडची तरतूद रक्कम वर्ग करणेबाबत प्रस्तावात नमूद नुसार सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मबाक चे मंजूर बजेट मधील अनु.क्र.१ वर असलेल्या महिला व मुलींकरीता विविध तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण या सदरी र.रु.२९.०० लाख इतकी रक्कम तरतूद केली होती.त्यामधून महिला व मुलींकरीता विविध प्रशिक्षण दि.१४/३/२०१४ ते १६/८/२०१५ या कालावधीकरीता घेणेत आले होते.त्या प्रशिक्षणाची मुदत दि.१६/८/२०१५ रोजी संपणार आहे.सदरचे प्रशिक्षणाचे एकूण देय रक्कमेपोटी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ५० टक्के ॲडव्हान्स रक्कम घेऊन ज्या त्या प्रशिक्षण संस्थेस आदा केलेली आहे.व त्यांचे उर्वरित र.रुपये १४,५५,०००/- इतके सन २०१५-१६ या चालू वर्षात संस्थेस अदा करावे लागणार आहे.सबब प्रस्तावात नमूद कारणास्तव मा.यांचे आदेशान्वये मबाक बजेट विवरण पत्रातील १) अनु.क्र.२४-महिला बचतगट क्षमता बांधणी उद्योजकता प्रशिक्षण तरतूद र.रु.५.०० लाख,(२)अनु.क्र.२५-महिला बचत गट उत्पादन वस्तू (साहित्य विक्री व प्रदर्शन) तरतूद र.रु.५.०० लाख,(३)अनु.क्र.२६-कन्या कल्याण निधी (पहिल्या दुस-या मुलींच्या जन्मानंतर रक्कम रुपये ५०००/- ठेव योजना) तरतूद र.रु.५.०० लाख,(४) अनु.क्र.२७- कला क्रिडा शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात परदेशात प्रतिनिधीत्व करणा-या महिला,मुली करीता प्रोत्साहनपर अनुदान-तरतूद र.रु.५.०० लाख याचारही योजनेअंतर्गत तरतूद असलेली रक्कम महिला मुली करीता व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण घेणेकामी वर्ग करुन घेतलेस एकूण र.रु.४०.०० लाख इतकी रक्कम उपलब्ध होईल.या उपलब्ध रक्कमेतून मागील वर्षात घेतलेल्या प्रशिक्षण संस्थेचे उर्वरित देय रक्कम अदार करता येईल.तरी सदरचे प्रस्तावात नमूदप्रमाणे सन २०१५-१६ चे मबाक चे मंजूर बजेट विवरण पत्रातील अनु.क्र.२४,२५,२६ व २७ या सदरी असलेल्या योजनांची प्रत्येकी तरतूद रुपये ५.०० लाख याप्रमाणे एकूण रुपये २०.०० लाख इतकी रक्कम महिला व मुलींकरीता तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण या सदरी वर्ग करणेस,मा.स्थायी समितीची मान्यतेअंती मा.सर्वसाधारण सभेंपुढे मान्यतेस्तव पाठविणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक १/११/१५चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन करुन प्रस्तावात नमूद अनु.क्र.२६ - कन्या कल्याण निधी (पहिल्या दुस-या मुलींच्या जन्मानंतर रक्कम रुपये ५०००/- ठेव योजना) ही रक्कम वर्ग न करता सदर योजनेप्रमाणे कार्यवाही ठेवणेत यावी.आणि प्रस्तावात नमूद प्रमाणे इतर रक्कमा वर्ग करणेस,मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ४८६, दि. २१-११-१५ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.323. ठ. क्र. 304
दि. 9/8/2016 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत प्राप्त असलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार मा. महाराष्ट्र राज्याच्या स्टेट हाय पॉवर कमिटीच्या बैठकीत सोलापूर शहराचे स्मार्ट सिटी चॅलेंज प्रस्तावाची (टप्पा क्र.२) शिफारस होऊन तो विहीत मुदतीत सोलापूर महानगरपालिकेकडून दि. १५-१२-१५ रोजी शहरी विकास मंत्रालय, निर्माण भवन, नवी दिल्ली येथे स्पर्धेत अंतीम होऊन त्यास मंजूरी मिळणेकरिता सादर केला आहे. प्रस्तावातील सर्व नमूद बाबींची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ११-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासुली~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३३९ ठ. क्र. ३०६
दि. १८।२।१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



सिध्देश्वर मंदिर ते संमती कट्टा येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरचे काम गड्डा यात्रेपूर्वी पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असलेने सदरचे काम मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)अन्वये अशा प्रकारची कामे करणारे अनुभवी मक्तेदार बी.एच.लामकाने यांचेकडून कामाचे पूर्वगणपत्रक क्र.०१/२०१५-१६ र.रु.१२,८५,५७५/- इतक्या रक्कमेच्या दरापेक्षा एक टक्का कमी दराने करुन घेणेस,तातडीने जागेवर काम सुरु करणेस,मक्तेदार बी.एच.लामकाने यांना जा.क्र.सार्व.आ.अभियंता /जनी/८९७ दिनांक २८/१०/१५ ने दिलेली वर्कऑर्डर व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.स्थायी समितीमार्फत मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस, मा.आयुक्त यांचे दिनांक २०/१०/१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा. स्थायी समिति ठराव क्र. ५२८, दि. ८-१-१६ चे शिफारसीप्रमाणे आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ३४० ठ. क्र. ३०८
दि. ९/८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३४०

पशु वैद्यकीय विभागाकडील एकवट मानधनावरील ॲनिमल किपर सेवकास मुदतवाढ नियुक्ती देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा.सेवकवर्ग निवड समितीनेनिवड केलेल्या भारत शिंदे यांची दि.१२/०६/२०१५ पासून पुढील सहा महिन्याकरीता एकवट मानधन रुपये १२०००/- यावर मुदतवाढ देण्यांत आलेली होती.त्याची मुदत दि.११/१२/२०१५ रोजी संपुष्टात येता असल्याने,प्रस्तावात नमूद प्रमाणे पशु वैद्यकीय अधिकारी यांचे निवेदनात नमूद कारणास्तव त्यांनी केलेले विनंती पाहता सध्या प्राणी संग्रहालय येथे श्री.भारत हरीदास शिंदे हे एकटेच ॲनिमल किपर कार्यरत असल्याने त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१४/१२/२०१५ पासून पुढे अकरा महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक २८/११/२०१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५४० दि. ८-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.3 ७९ ठ. क्र. 30६
दि. ९/१/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री.डॉ.घनश्याम मो.पवार - पशुवैद्यकीय अधिकारी यांचे एकवट मानधनावरील नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव पशुवैद्यकीय अधिकारी यापदी दरमहा एकवट मानधन रुपये १८०००/-यावर शर्ती अटीस अधिन राहून श्री.डॉ.घनश्याम मो.पवार यांची नियुक्ती करण्यांत आलेली असून,त्यांची मुदत दि.१२/१२/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये नव्याने निर्माण केलेल्या पशुवैद्यकीय अधिकारी पदास व सदर कार्यरत सेवकास दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.१५/१२/२०१५ पासून पुढे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देणेस सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.म.न.पा.चे मान्यतेसाठी सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दि. २८/११/२०१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.म.न.पा.ची मान्यता मिळणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५४२, दि. ८-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३४२ ठ. क्र. ३०८
दि. १८/१/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



महिला व मुलींकरीता विविध तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणासाठी वाढीव बजेट उपलब्ध होऊन मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मागीलवर्षी घेण्यांत आलेल्या प्रशिक्षणासाठी देय र.रुपये ३०.०० लाख चालू वर्षात देणे आवश्यक असलेने,सदरची रक्कम चालू वर्षात खर्ची घालणेकामी रुपये ३०.०० लाख इतकी तरतूद उपलब्ध होवून मिळणे्कामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव पाठविणेस व मान्यतेअंति मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २३/१२/१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देणेत येत असून, सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१७, दि. ८-१-१६ चे शिफारसीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणी सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका